N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत जॉच फार्म -I)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नागपूर शहर **P.S.(ठाणे):** सीताबर्डी **Year (वर्ष):** 2019

   **FIR No.(प्रथम खबर** 0057 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2019 23:30 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, [illegible] (सुधारणा) 2018 | 7 (अ) |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day** शनिवार **Date From (दिनांक** 16/02/2019 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2019
      **Time Period (कालावधी):** पहर 5 **Time From** 15:43 बजे **Time To (वेळेपर्यंत):** 15:43 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले** **Date (दिनांक ):** 16/02/2019 **Time (वेळ):** 20:45 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा** **Entry No. (नोंद क्र.):** 035 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2019 23:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा):** पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** प्रादेशिक परीवहन अधिकारी ,कार्यालय नागपूर शहर चे परीसरात,नागपूर शहर

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे** **District(State) (जिल्हा**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

   **(a) Name (नाव):** श्री. [illegible] नंदनवार वय 55 साल

   **(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव) :**

   **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1964 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   **(e) UID No. (यु.आय.डी.**

   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची**

   **Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| S.No.(अ.क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | प्लॉट नं 534, टिमकी, दादरा पुलाजवळ, नागपूर , पाचपावली,नागपूर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | प्लॉट नं 534, टिमकी, दादरा पुलाजवळ, नागपूर , पाचपावली,नागपूर शहर,महाराष्ट्र,भारत |

   **(i) Occupation (व्यवसाय):**

   **(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No.(अ. | Name (नाव) | Alias (उर्फ नाव) | Relative's Name (नातेवाईकाचे | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. [illegible] वय 50 वर्ष | | | 1. छावणी हनुमान मंदीर छावणी, नागपूर-13 ,सदर, नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

# फिर्याद

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक १६/०२/२०१९

मी श्री. रामेश्वर लक्ष्मणराव नंदनवार वय ५५ वर्षे, व्यवसाय—नौकरी (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, महानगरपालिका, महाल, गांधीबाग, झोन क्र. ६, नागपूर येथे अतिक्रमण पथक प्रमुख म्हणुन नेमणुकीस आहे) रा. प्लॉट नं. ५३४, टिमकी, दादरा पुलाजवळ, नागपूर मो. नं. ९८२३९९९१२४

मी वर दिलेल्या पत्यावर राहत असुन दि. १६.०२.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

## तक्रार

अ‍ॅ.क.ब्यु. नागपूर
दि. १६.०२.२०१९

नाव :— श्री. रामेश्वर लक्ष्मणराव नंदनवार वय ५५ वर्षे, व्यवसाय—नौकरी (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, महानगरपालिका, महाल, गांधीबाग, झोन क्र. ६, नागपूर तेथे अतिक्रमण पथक प्रमुख म्हणुन नेमणुकीस आहे) रा. प्लॉट नं. ५३४, टिमकी, दादरा पुलाजवळ, नागपूर मो. नं. ९८२३९९९१२४

''मी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर कार्यालयात येवून आपली तक्रार देतो की, मी वर दिलेल्या पत्यावर राहत असुन स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, महानगरपालिका, महाल, गांधीबाग, झोन क्र. ६, नागपूर येथे अतिक्रमण पथक प्रमुख म्हणुन नेमणुकीस आहे.

मी दि. १६.०२.२०१९ ला आर.टी.ओ. नागपूर कार्यालयात माझ्याकडे असलेल्या चारचाकी गाडी ऑल्टो ८०० क्रमांक एम.एच. ४९ यु. ५२१९ चे मुळ कागदपत्र हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती काढण्याकरिता गेलो असता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर कार्यालयातील परिसरामध्ये बाहेर उभे असतांना एक खाजगी ईसम माझे जवळ आले व त्यांनी त्यांचे नाव श्री. वानखेडे असे सांगीतले व मी आर.टी.ओ. संबंधीत सर्व सत्यप्रती काढणे, कागदपत्रे काढणे, लर्नींग लायसन्स बनविने व इतर आर.टी.ओ. संबंधीत कामे मी करतो असे म्हणाले. मी माझे कामाबाबत त्यांना सांगीतले त्यावर खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे मला म्हणाले की, ''आर.टी.ओ. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी माझे घनिष्ठ संबंध आहेत. तुम्हाला तुमचे गाडीचे कागदपत्रे हवे असल्यास आर.टी.ओ. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून मी तुमचे काम करून देतो त्याकरिता आर. टी.ओ. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच माझा खर्च असे एकुण रू. ५,७००/— लागतील'' असे म्हणुन मला लाच रक्कम रू. ५,७००/— ची मागणी केली. मला रू. ५,७००/— घेवून प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील परीसरात घेवून आज दि. १६.०२.२०१९ रोजी दुपारी बोलाविले.

माझ्याकडे असलेल्या चारचाकी गाडी ऑल्टो ८०० क्रमांक एम.एच. ४९ यु. ५२१९ चे मुळ कागदपत्र हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती काढण्याकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच

स्वत:च्या खर्चाकरिता खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांनी मागीतलेली लाच रक्कम रू. ५,७००/— देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही तसेच त्यांच्याशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करिता रिपोर्ट देत आहे. मी माझे कडे असलेले रू. ५,७००/— कार्यवाही करीता हजर करीत आहे.''

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन शासकीय पंचाला पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व मी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी माझ्याकडून लाचेकरिता वापरण्यात येणारी रक्कम रू. ५,७०० (ज्यात रू. ५००/— दराच्या ११ व रू. १००/— दराच्या २ चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस ॲंथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १२.३६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील खाजगी ईसमाकडे (दलाल) श्री. वानखेडे लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे दुचाकीने पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथे गेलो असता तेथे खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे हे भेटले.

खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांनी माझ्याकडे असलेल्या चारचाकी गाडी ऑल्टो ८०० क्रमांक एम.एच. ४९ यु. ५२१९ चे मुळ कागदपत्र हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती काढण्याकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच स्वत:च्या खर्चाकरिता ५,७००/— रू. लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर वेळ १४.१२ वा. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी व्हाईस रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांनी माझ्याकडे असलेल्या चारचाकी गाडी ऑल्टो ८०० क्रमांक एम.एच. ४९ यु. ५२१९ चे मुळ कागदपत्र हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती काढण्याकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच स्वत:च्या खर्चाकरिता ५,७००/— रू. ची लाच रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी लगेच सापळा कारवाई करावयाची आहे असे पंचासमक्ष सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर माझेकडे असलेल्या रूमालाने तोंड पुसून

हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती प्रादेषिक परीवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथून काढण्याकरीता प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच स्वतःच्या खर्चाकरिता रू. 5,700/- लाच रक्कमेची मागणी करून खाजगी ईसम (दलाल) श्री. गोपाल साबजी धानखेडे यांनी स्वतः स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली.ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाई: बाब क्र.2 मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम) HEMANT KUMAR KEWALRAMJI KHARABE(I (Inspector)) / POBN67197 or

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव): **Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास

(4) **Transferred to P.S.**(पुन्हा **District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): HEMANT KUMAR KEWALRAMJI KHARABE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67197

खांदयावर ठेवण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डर्व्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रू. ५,७००/— रू. ५,७०० (ज्यात रू. ५००/— दराच्या ११ व रू. १००/— दराच्या २ चलनी नोटा) माझे शर्टच्या डाव्या खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर वेळ १५.४५ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह दुचाकी वाहनाने प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील परीसरातील खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांचेकडे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील परीसरात गेलो. त्याठिकाणी खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे हजर होते. खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांनी माझेशी माझे कामाविषयी बोलणी करून लाच रक्कम रू. ५,७००/— मागणी केली. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रकम रू. ५,७००/— (ज्यात रू. ५००/— दराच्या ११ व रू. १००/— दराच्या २ चलनी नोटा) माझे शर्टच्या डाव्या खिशातून काढून खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यांना दिली असता त्यांनी लाच रक्कम रू. ५,७००/— स्वत: स्विकारून शर्टच्या डाव्या खिशात ठेवली त्यानंतर मी सापळा पथकास माझा रूमाल काढून तोंड पुसून खांदयावर ठेवून नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने खाजगी ईसम (दलाल) श्री. वानखेडे यास रंगेहात पकडले. त्यानंतर वेळ १५.४५ वा. पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी खाजगी ईसम आरोपी श्री. गोपाल सावजी वानखेडे वय ५० वर्ष व्यवसाय—खाजगी काम (दलाल) प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर रा. छावणी हनुमान मदीर छावणी नागपूर—१३ यांनी माझ्याकडे असलेल्या चारचाकी गाडी ऑल्टो ८०० क्रमांक एम.एच. ४९ यु. ५२१९ चे मुळ कागदपत्र हरविल्यामुळे दुय्यम सत्यप्रती प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथून काढण्याकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नागपूर शहर येथील अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च, ऑनलाईन फी तसेच स्वत:च्या खर्चाकरिता रू. ५,७००/— लाच रक्कमेची मागणी करून खाजगी ईसम (दलाल) श्री. गोपाल सावजी वानखेडे यांनी स्वत: स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे

समक्ष

(फाल्गुन घोडमारे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर